आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. नवरात्र उत्सवाला सर्वत्र प्रारंभ; नागपूर जवळील प्रसिद्ध कोराडी महालक्ष्मी जगदंबा मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठी रांग.
2. लाडकी बहीण योजना निवडणुका समोर ठेवून आखलेल्या नसल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन.
3. बांधकाम कामगारांना ओळखपत्राद्वारे विविध योजनांचा लाभ मिळणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं 'बांधकाम कामगार मेळाव्यात' आश्वासन.
4. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सुविधांची तयारी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांचे निर्देश.

****

नवरात्रोत्सव

शारदीय नवरात्रोत्सवाला, आजपासून प्रारंभ झाला असून, सर्वत्र भक्तिमय वातावरणात, देवीची आराधना केली जात आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांत, देवीची नऊ रुपांमध्ये पूजा केली जाते. सजावटीसह लागणारं साहित्य, मातीचे घट, झेंडूची फुलं यांच्या, खरेदीसाठी सर्व बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून येत आहे. नागपुर जवळील कोराडी इथल्या श्रीमहालक्ष्मी जगदंबेच्या आश्विन नवरात्र उत्सवाला, आज मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. नवरात्रोत्सवाच्या पर्वावर मंदिरात भाविकांची दर्शनाकरिता गर्दी पाहायला मिळत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सुद्धा, श्रीमहालक्ष्मी जगदंबेचं दर्शन घेतलं. नवरात्रोत्सवाच्या काळात सलग दहा दिवस हे मंदिर चोवीस तास खुले असते. या काळात भाविकांची गैरसोय होऊ नये तसंच प्रत्येकाला मातेचं दर्शन घेता यावं यासाठी, मंदिर प्रशासनासह पोलिस विभाग आणि शासकीय व्यवस्थाही सक्रिय आहेत. तसंच कोराडी देवी मंदिराच्या, अखंड मनोकामना ज्योतीच्या उपक्रमाला विशेष महत्त्व आहे. दरवर्षी नागपूरसह वैदर्भीय भाविक या उपक्रमात मोठ्या संख्येनं सहभागी होतात. दरम्यान, अमरावती जिल्ह्यात अंबा देवी आणि चंद्रपूर जिल्ह्यात महाकाली मंदिरात देखील नवरात्र उत्सवासाठी गर्दी पाहायला मिळत आहे. गोंदियाची महाराणी म्हणून ओळखली जाणारी इंगळे चौकातील दुर्गा देवीसह यावर्षी गोंदिया जिल्ह्यात ५८५ ठिकाणी दुर्गा

देवीची प्रतिष्ठापना झाली असून, आज सकाळ पासूनच दुर्गा देवीच्या मूर्ती ढोल तासाच्या गजरात, भक्त आपल्या मंडपात घेऊन आले आहेत.

****

**मुख्यमंत्री/लाडकी बहीण हफ्ता**

बुलढाणा जिल्हयातील खामगांव येथील, श्रीमहर्षी वेद व्यास प्रतिष्ठान, आळंदी अंतर्गत, जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आलं. खामगांव मधील घाटपुरी येथील श्रीजय जगदंबा माता संस्थान इथं आयोजित या भूमिपूजन समारंभास केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण तथा आयुष राज्यमंत्री, प्रतापराव जाधव, अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष, स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज, आमदार आकाश फुंडकर आणि संजय गायकवाड तसंच संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संस्थांनच्यावतीनं मुख्यमंत्र्यांचा स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. दरम्यान बुलढाणा इथल्या कार्यक्रमानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, लाडकी बहीण योजना त्याचप्रमाणे इतर योजना या, निवडणुका समोर ठेवून आखलेल्या नाहीत-

*सावत्र भावांना सद्‌बुद्‌धी मिळू दे, आणि या योजनांमध्ये त्यांनी खोड्‌या घालता कामा नये आणि खोड्‌या घातल्या तरी सुद्‌धा या योजना कायम स्वरूपी सुरु राहतील. या योजना किती बंद पाडण्याचा प्रयत्न केला, कोर्टामध्ये काही लोक गेले, आणखी काही लोक कोर्टात गेले, कोर्टाने चपराक दिली आहे. परंतु या योजना निवडणुकांसाठी आम्ही केलेल्या नाहीत. या योजना माझ्या लाडक्या बहिणींच्या, लाडक्या भावांच्या, लाडक्या शेतकऱ्यांच्या, लाडक्या ज्येष्ठांच्या सगळ्यांच्या जीवनामध्ये आमूलाग्र बदल घडवण्यासाठी या केल्या आहे.*

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत राज्यातल्या एक कोटी ९६ लाख ४३ हजार २०७ पात्र महिलांच्या खात्यात, तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा झाल्याची माहिती, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी उर्वरित पात्र महिलांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असं म्हटलं आहे. राज्यातल्या दोन कोटी महिलांना लाभ मिळालेली ही सर्वात मोठी आणि ऐतिहासिक योजना असल्याचंही पवार आपल्या संदेशात म्हणाले.

****

**पोहरादेवी मोदी भेट**

बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या, वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी इथं 'बंजारा विरासत' नंगारा म्युझियमचे लोकार्पण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, येत्या पाच ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे. या कार्यक्रमास राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि अजित पवार कार्यक्रमाचे आयोजक तथा यवतमाळ-वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड आदी उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमानंतर आयोजित मुख्य सभेला देखील पंतप्रधान संबोधित करणार आहेत. पारंपरिक आणि आधुनिक वास्तुकलेचा मेळ घालून सोळा एकर परिसरात हे पाच मजली नंगारा वास्तू संग्रहालय उभारलं आहे. त्यात तेरा विविध गॅलरी असून, इथं बंजारा समाजाचा इतिहास, परंपरा, संस्कृतीचं दर्शन होणार आहे.

****

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रेडिओच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याच्या मन की बात हा विशेष कार्यक्रम सुरु झाल्याला आज दहा वर्ष पूर्ण झाली. पंतप्रधानानी २०१४ मध्ये आजच्या दिवशी पहिल्यांदा या कार्यक्रमातून जनतेशी थेट संवाद साधला होता. आजवर या कार्यक्रमाच्या विविध भागात पंतप्रधानानी सर्वसामान्य माणसाचं जीवन प्रभावित करणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण विषयक मुद्द्यांवर चर्चा केली आहे.

****

राज्यपाल

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी आज वर्धा विश्रामगृह इथं आयोजित बैठकीत जिल्ह्यातील विविध विकासकामे आणि योजनांचा आढावा घेतला. शासनाच्या, लोकोपयोगी योजनांचा लाभ, तळागाळातील लाभार्थ्यांना देण्यासाठी, यंत्रणांनी पुढाकार घ्यावा अशा सुचना, त्यांनी यावेळी केल्या.

बांधकाम कामगार-फडणवीस

सामान्य माणसाच्या जीवनात, परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीनं, विविध कल्याणकारी योजनांची, प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. बांधकाम कामगारांना, सुरक्षा ओळखपत्र वितरणाच्या माध्यमातून, विविध योजनांद्वारे, आरोग्य, शिक्षण, घरकुल आदी लाभ देण्यात येत असल्याचं प्रतिपादन, उपमुख्यमंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री, देवेंद्र फडणवीस यांनी आज, बांधकाम कामगारांच्या मेळाव्यात केलं. फडणवीस यांच्या हस्ते कामगारांना, ओळखपत्र, संसार आणि सुरक्षा किटचं तसंच बचत गटांना

फुड कार्टचं वाटप करण्यात आलं. नागपूरच्या जयताळा परिसरातील, एस.आर.पी. मैदानावर आयोजित, 'बांधकाम कामगार मेळाव्यात', उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

*जन्मापासून मृत्यूपर्यन्त प्रत्येक स्टेजला वेगवेगळ्या योजनांचा बेनिफिट या एक कार्डामुळे आपल्याला मिळतो. भांडीकुंडी मिळतात, किट मिळतात, पाच हजार मिळतात, एवढेच नाही मुलांच्या शिक्षणाकरता देखील या कार्डावर पैशे मिळतात. इन्शुरन्सच्या माध्यमातून याच कार्डमुळे अपघात झाला त्याठिकाणी पैशे मिळतात. याच कार्डमुळे जर आपल्याला जर मेडिकल ऑपेरेशनची गरज पडली तर तेही आपल्याला मोफत देण्याची व्यवस्था याच कार्डाच्या माध्यमातून या ठिकाणी होते.*

बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून, जयताळा परिसरातील चार हजार कामगारांची नोंदणी झाली आहे. या मेळाव्यात महिला आर्थिक विकास महामंडळ नागपूर यांच्या नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत, अर्थसहाय्यित प्रातिनिधिक बचत गटांना, 'तेजस्विनी अन्नपूर्णा फूड कार्ट' हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. एकूण वीस फुड कार्टच्या माध्यमातून, दोनशे महिलांना, रोजगार उपलब्ध होणार आहे. या भागात बेघरांना मालकी हक्काचे पट्टे देण्याच्या दिशेनं काम सुरू असून, येत्या सहा महिन्यात हे काम पूर्ण होईल आणि पट्टे वितरीत करण्यात येतील अशी माहिती फडणवीसांनी यावेळी दिली.

****

धम्मचक्र प्रवर्तन दिन

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगानं दीक्षाभूमीवर येणा-या लाखो बौद्ध अनुयायांच्या सोयीसाठी, नागपूर मनपाद्वारे विविध सुविधांची व्यवस्था करण्यात येत आहे. या सर्व आवश्यक सुविधांची तयारी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी दिले आहेत. नागरिकांची गैरसोय होउ नये तसंच त्यांना तात्काळ मदत मिळावी यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करणे, संपूर्ण परिसरात स्वच्छता राखणे, सर्वत्र विद्युत पुरवठा करणे, पिण्याचं पाणी, शौचालय, परिवहन सेवा या सर्व सुविधा सुरळीतपणे चालविल्या जातील या दृष्टीनं नियोजन करण्याचं, आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी निर्देशित केलं आहे. दीक्षाभूमीकडे येणाऱ्या मार्गांवर मुख्य चार ठिकाणी अनुयायांच्या सेवेसाठी मनपाच्या आरोग्य तपासणी केंद्रांची व्यवस्था केली जाणार आहे. याशिवाय संपूर्ण मार्गावर पिण्याच्या पाण्याच्या १४० नळांची व्यवस्था असेल. याशिवाय तात्पुरत्या स्वरुपात, ९०० शौचालयांची देखील व्यवस्था, नागपूर मनपाद्वारे करण्यात येत आहे. याशिवाय

चार फिरते प्रसाधनगृहांची देखील, सोय असेल. संपूर्ण दीक्षाभूमी परिसरात स्वच्छतेसाठी, ६६४ स्वच्छता कर्मचारी अहोरात्र स्वच्छतेची सेवा देण्यासाठी सज्ज आहेत. दीक्षाभूमीच्या परिसरात लावण्यात येणा-या स्टॉलवर कुठेही सिलेंडर अथवा तत्सम ज्वलनशील वस्तूंचा वापर होउ नये याबाबत, विशेष काळजी घेण्याचे निर्देशही, आयुक्त चौधरी यांनी दिलं आहे.

****

सामंजस्य करार

ओ.एफ.बी.टेक.प्रा.लि.मार्फत, महाराष्ट्रातील तयार कपड्यांच्या निर्मिती उद्योगाला, चालना देण्यासाठी वर्धा जिल्ह्यात, कारंजा, घाडगे इथं नव्यानं, ७५० रुपये कोटींची गुंतवणूक होणार आहे. याबाबत काल उपमुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत, महाराष्ट्र शासन आणि, ओ.एफ.बी.टेक.प्रा.लि. यांच्यात, सामंजस्य करार करण्यात आला. या गुंतवणुकीमुळ, १५ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. विदर्भात उपलब्ध, कच्चा माल, स्वस्त वीज, दळणवळणाच्या सोई सुविधा आणि अल्प दरात उपलब्ध, औद्योगिक भूखंड, यामुळ हा प्रकल्प, लवकर कार्यान्वित होण्यास मदत होणार आहे. यासोबतच परिसरातील महिला कारागिरांना मोठ्या प्रमाणात रोजगार आणि 'हब अँड स्पोक' मॉडेलद्वारे ग्रामीण भागातही उद्योगांना चालना मिळेल.

****

हवामान

आज आणि उद्या विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये, तुरळक ठिकाणी अत्यंत हलका पाऊस पडण्याची शक्यता, प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान, नागपुरात प्रचंड उकाडा जाणवतो आहे. येत्या काही तासात विदर्भातील अमरावती, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****